Impact Factor – 6.625 Special Issue - 225 Feb. 2020 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-research Journal

# Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy

Organized by

Political Science Department

**Women's College of Arts & Commerce**

310 B, New Nandanvan, Nagpur - 440 009



■ EXECUTIVE EDITOR ■

**Dr. Sampada S. Kullarwar**

■ ASSOCIATE EDITOR ■

**Dr. Sandip Tundurwar** ■ **Dr. Santosh Dakhare** ■ **Dr. Anjali Gaidhane**

■ CHIEF EDITOR ■

**Dr. Dhanraj T. Dhangar**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To : www.researchjourney.net**

SWATIDHAN PUBLICATIONS

Smt Rajkamal Baburao Tidke Mahavidyalaya Mouda SEAL

Principal
Smt Rajkamal Baburao Tidke
Mahavidyalaya Mouda

ISSN : 2348-7143
Feb. 2020

| | | |
|---|---|---|
| ५५. | भारतीय लोकशाहीत न्यायपालिकेची भूमिका व आव्हाने<br>प्रा. बबीता मनिष शुल | १५७ |
| ५६. | भारतातील लोकशाही आणि न्यायव्यवस्था<br>प्रा.डॉ.प्रमोद मा.आचेगावे | १६१ |
| ५७. | सर्वोच्च न्यायालयाची भूमिका<br>प्रा. डॉ. विमल राठोड | १६३ |
| ५८. | स्वतंत्र न्यायव्यवस्था व तिची गरज<br>प्रा.डॉ.चक्रधर बागडे | १६६ |
| ५९. | भारतीय लोकशाही, न्यायपालिका, राजकारण आणि मानवाधिकार: एक चिकित्सक अध्ययन<br>डॉ. दामोधर एन. भेंडे | १६९ |
| ६०. | लोकशाही व न्याय व्यवस्था<br>कु. विद्या चोरपगार (डाळींबकर) | १७३ |
| ६१. | भारतीय लोकशाहीत न्यायपालिकेची भूमिका<br>डॉ. विजया जि. राऊत | १७६ |
| ६२. | भारतीय लोकशाहीत न्यायालयाची भुमिका<br>प्रा उपेन्द्र बागुल | १७९ |
| ६३. | लोकशाही आणि न्यायालयीन सक्रीयता<br>डॉ. भारती मस्के | १८३ |
| ६४. | भारतीय लोकशाही न्यायव्यवस्था आणि महिला<br>डॉ. रंजना व्यवहारे | १८६ |
| ६५. | भारतीय न्यायव्यवस्था व न्यायालयीन सक्रीयत्ता<br>डॉ.राजेश्री एन.कडू | १८९ |
| ६६. | भारतीय संविधानातील न्यायिक पुनर्विलोकन – एक अध्ययन<br>डॉ. दिपाली दी. भावे | १९२ |
| ६७. | भारतात न्यायालयीन सक्रियतेचे महत्त्व<br>प्रा. डॉ. एम. जी. मेश्राम | १९५ |
| ६८. | न्यायिक सक्रीयता – न्यायालय लोकशाहीचा तिसरा खांब<br>डॉ. स्मिता दि. जोशी | २०१ |
| ६९. | भारतीय लोकशाही आणि न्यायमंडळाच्या सक्रियतेची भूमिका<br>प्रा. लालचंद्र मेश्राम | २०४ |
| ७०. | भारतीय लोकशाहीमध्ये न्यायव्यवस्थेचे महत्त्व<br>प्रा. डॉ. राजेंद्र एस. झाडे | २०७ |
| ७१. | भारतीय न्यायपालिका व संविधानिक प्रक्रिया<br>प्रा. चिन्नना चालुरकर | २०९ |
| ७२. | भारतीय लोकशाही व न्यायव्यवस्था<br>प्रा. यु.पी.शहारे | २१२ |

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 225 : Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy
ISSN : 2348-7143
Feb. 2020

# भारतात न्यायालयीन सक्रियतेचे महत्व

प्रा. डॉ. एम. जी. मेश्राम,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती राजकमल बाबुराव तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर.

फितरत तुम्हारी वफा कर गई
हसरत तुम्हारी दफा कर गई
जब बेबस रहा बर्बर बेचारा
बिसाद सतरंज की बेवफा कर गई।

**प्रस्तावना –**

स्वतंत्र भारताच्या संवैधानीक व्यवस्थेला सुचारू गतीशिलता प्राप्त होण्यासाठी न्यायालयीन सक्रियतेचा हमरस्ता अनन्यसाधारण फलदायी तसेच श्रेयस्कर ठरू शकतो. न्या. स. असा संक्षिप्त विचार केला तरी न्यास म्हणजे ज्तनेज अर्थात विश्वास अशी संगती सर्वथैव पाहण्याजोगी आहे. भारतीय सांसदीय शासनप्रणालीची संघराज्यात्मक संरचना न्यायालयीन सर्वोच्चता, सत्ता विभाजन व नागरीकांचे निश्चित मुलभूत अधिकार यामुळे सत्तेचे सुतक लावणाऱ्या कायदेमंडळातील आणि कार्यकारी मंडळातील किमानपक्षी धुरंधर राजकारणी लोकांना (नेत्यांना) प्राय: अनेकदा अडचणीचे ठरते. प्रशिक्षित तज्ञांचे प्रशासन आणि जनसामान्यांचा कैवार मांडणारांचे शासन असा सुवर्णमध्य साधण्याचा प्रांजळ हेतू संविधानाच्या शिल्पकारांचा होता. पहीले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्यातील पत्रव्यवहारात पदाची महीमा आणि सत्तेची गरीमा यावरून संघर्ष झालेला दिसतो. राष्ट्रपती गॅनी झैलसिंह आणि पंतप्रधान राजीव गांधी यांच्यात देखील कुरघोडी उद्‌भवत होती. राष्ट्रपती के. आर. नारायणन् आणि पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यातील धोरणात्मक सुंदोपसुंदी सर्वांना ज्ञात आहे. राष्ट्रपती आणि राज्यपाल (कलम ८७/१७६) यांचे अभिभाषण, सरकारी विधेयकावर विभिन्न अवस्थांमध्ये चर्चा, मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव. धर्मनिरपेक्षता, समता नि विषमतेचा तिढा, आरक्षण, भ्रष्टाचार, व्याभिचार, गुन्हेगारी, दांभिक बदफैली प्रवृत्ती, नतद्रष्टांचा हैदोस, साठेबाजी, काळाबाजारी यामुळे. अगदी शिर्षस्थ स्तरांपासून तळपातळी पर्यंत सौहार्दाचा परिकोष वादंगात गुरफटतो. मुलत: भारतीय गौरवशाली संस्कृतीचे कुतूहलजनक बहुआयामी अभिरूप परस्परविसंवादक अभिनिवेशाने अनेकदा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे गूंतागुंतीच्या संकटात सापडते. स्वतंत्र भारताच्या संवैधानिक लोकशाहीतदेखील ते पिच्छा सोडताना दिसत नाही. जनसामान्यांवर स्वत:चे अधिनायकत्व प्रस्थापित करण्यासाठी काहीजण हेतूपूरस्पर आततायी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. साकल्याने विचार करून स्विकृत व्यवस्था सक्षम करण्याऐवजी तीला कडेलोट करून वाममार्गाचा विचार पुढे आणला जातो. उदा. १९६२ साली जे. आर. डी. टाटा, १९७५-७६ साली महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतूले, १९८४ साली नाना पालखीवाला (संविधान विशेषज्ञ) १९८६ मध्ये कर्नाटकचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे, १९८७ मध्ये भाजप अध्यक्ष लालकृष्ण आडवाणी इ. प्रभृतींनी अध्यक्षीय प्रणालीचा विचार पुढे आणला. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने २००० साली संविधान समीक्षण आयोग बसविला. सरकारच्या अंतर्गत हेतूबद्दल संशय घेवून मुलभूत ढाच्याला बदलण्यास विरोधच नव्हे तर संविधान समीक्षणालाच एकवटून विरोधकांनी तीव्र विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहीलेले संविधान फक्त दलीत-शोषित-पिडीत मागासवर्गीयांचा कल्याणपथ आहे. असा भ्रम समाजात खोलवर रूजला होता. विद्यमान नेंद्र मोदी सरकारने संविधानाची महता आणि उपयुक्तता तद्वतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय ध्येयधोरण निरंतर प्रभावीपणे उलगडण्याचा प्रयत्न केला. असो. दोष संविधानाचा नसून जे अंमलबजावणी करतात. त्यांचा सद्सद्विवेक आणि ज्यांच्यावर अंमलबजावणी होते. त्यांचे त्याविषयी आकलन, पारदर्शकता अवश्यभावी असते. नेते, सत्ताधारी, प्रशासन यंत्रणा, जनता यांची न्यायालयीन सक्रियता प्राय: शिक्षण, प्रशिक्षण, वैचारीक प्रबोधन, सामाजिक जागरण या अधिष्ठानावर सौष्ठव प्राप्त करू शकते.

संक्षेप –

१) न्या. स. –न्यायालयीन सक्रियता.
२) भाजप –भारतीय जनता पार्टी

**गृहितके –**

१. मनुष्य संघर्षशील समन्वयात्मक धोरणाने परीस्थितीजन्य अनूभवाच्या आधारे मनोवांछीत ध्येयसिध्दीसाठी झटत असतो.
२. मनुष्याची दुष्प्रवृत्ती आणि अनवधानाने सत्वृत्तीसुध्दा विकृती निर्माण करते. सत्वृत्ती संस्कृती उभारते. दोहोंचा प्रादूर्भाव सकल मानवी समाजावर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जाणवतो.
३. सत्ता प्राप्तीच्या शह-प्रतिशहात अधिकारांचा अभिमान आणि अस्मितेचा स्वाभिमान यातील संघर्षात पूर्वाग्रह आणि संभ्रमाने



Smt Rajkamal Baburao Tidke Mahavidyalaya SEAL
Principal
Smt Rajkamal Baburao Tidke Mahavidyalaya Mouda

विस्कळलेला विवाद व्यवस्था संकटात घालतो.

४. सत्तालोलुप राज्यकर्त्यांचा सुप्त अजेंडा जनतेला भयप्रद करत असेल तर उत्तमोत्तम ध्येयधोरणांची देखील अंमलबजावणी रसातळाला जाते.

५. वैचारीक विसंवाद आततायी झाल्यास शांतता, सुव्यवस्था व संरक्षणाची विजिगिषू व्यवस्था कोलमडून गोंधळाची विपरीतावस्था सामाजिक सौहार्द रसातळाला नेते.

६. न्यायदानासाठी प्राण पणाला लावताना कायद्याचे भान ठेवल्यास व्यक्ती आणि समाज राष्ट्रीय आवर्तात उत्कृष्टपणे उन्नयनाची अनुकूल करू शकतात.

**न्या. स. चे सर्वांगीण महत्त्व –**

मादीला माय म्हणून पुसताना तिची कत्तल करणारांविरूध्द आक्रंदणास सरसावणारे बलदंड हात असणाऱ्या भारतात बाईवर (स्त्रियांवर) न्यायालयाकडून वक्रदृष्टी कशी पडते? गिधाडे–कुत्रे–वाघ–नाग–कावळे इ. पशुपक्ष्यांच्या संरक्षणाचा मुद्दा जोरदार ताकदीने लढून धरणाऱ्या समाजात माणसांवर माणसांनी निष्ठुर जाचांची अश्लाध्य बेढंगी बुनियाद कशी आली? राममंदीर उभारणीसाठी अयोध्येच्या मंदीर–मस्जीद वादावर पडदा घातल्या गेला. मस्जीदीच्या कचाटयातून मंदीर मुक्त करण्याचा हाच न्याय तथागत गौतम बुध्दांनी विहारामध्ये जेथे सम्यक ज्ञान संपादन केले, त्या महाबोधी महाविहारास बौध्द लोकांच्या ताब्यात का देत नाही? न्यायालयीन व्यवस्थेला राजकारणी कुरघोडीने ग्रासण्याच्या ग्लानीपासून मुक्तीसाठी न्यायालयीन सक्रियता महत्वपूर्ण आहे. लोकशाही सुरळीत चालावी, लोकांना मुलभूत अधिकारांचा यथायोग्य आस्वाद घेता यावा. दडपणूक, जुलूम, अन्याय, प्रतिबंधित करता यावा. संवैधानिक शाश्वतीशिवाय न्यायसंस्थेविना राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य धोक्यात येते. त्यायोगे न्यायालय आणि संविधान, न्यायालय आणि विधीमंडळ (संसद), न्यायालय आणि कार्यकारी मंडळ, न्यायालय आणि नागरीक यांचा अन्योन्याश्रयी संबंध प्रगतीशिल नीतीमत्तेचे असावेत. दुर्गती उत्पन्न करणारे नसावेत. ''लाडका कुत्रा चावला तर चुपचाप आणि कुत्र्याला ठोकले तर मनःस्ताप'' अशी विसंगती वृत्ती नसावी. कुत्रा मारला म्हणून काळजीने तक्रार करणारांनी मनुष्य छळांविषयी तितकेच सतर्क असले पाहीजे. हौसीखातर व्याघ्रप्रकल्प–अभयारण्य उभारलेत. वाघ गावात येतो. गोठयातील जनावरांचा प्राण घेतो. गावात पाळीव जनावरांची कुरणे संपलीत. जनावरे पाळणे कठीण झाले. शेतकरी जनावरे विकतात. कत्तलखान्यात जाणारी जनावरे गो–रक्षक अडवतात. ही गुंतागुंत सोडविण्यासाठी संविधानाने निर्देशित केलेली मानवतावादी नीतीसंहिता धोक्यात आणू नये. संविधान म्हणजे काय? ते खालील व्याख्यावरून लक्षात येईल.

**संविधानाच्या व्याख्या –**

१. **ऑस्टिन –** ''सर्वोच्च शासनाचे संघटन सुनिश्चित करणाऱ्या नियमांचा समूह म्हणजे संविधान होय.''

२. **वुल्जे –** ''ज्या नियमांच्या संग्रहाद्वारे सरकारची शक्ती आणि शासितांचे अधिकार तसेच त्या दोहोंचे संबंधाविषयी व्याख्यांकन करता येते ते संविधान होय.''

३. **डायसी –** ''प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्षपणे राज्य आणि राज्याची सत्ता वितरण व अंमलबजावणीचे निर्धारण करणाऱ्या नियमांना संविधान म्हणता येते.''

४. **ब्राइस –** ''ज्या नियमांद्वारे सरकारचा आधार व आकाराचे निर्णय, त्यासंदर्भात नागरिकांचे अधिकार व कर्तव्य निर्धारीत केले जातात. त्याला संविधान म्हणता येते.''.

५. **ॲरीस्टॉटल –** '' राज्याचे कार्य आणि नागरीकांचे अधिकार संविधानाने निश्चित केले जातात.''

६. **जैलीनेक –** ''राज्याचे मुलगामी अंग निश्चित करणे, त्या अंगानुगत रचनेचे कायदे, परस्पर संबंध, कार्यक्षेत्र आणि त्याचे राज्याशी संबंध व राज्यामधील समुचित स्थान ठरविणाऱ्या नियमांच्या संकलनास संविधान म्हणतात.''

७. **गैटेल –** ''सरकारची संरचना तयार करणाऱ्या मुलभूत सिंध्दांताला संविधान म्हणतात. त्यात ज्या साधनांच्या आधारे राज्य बनणार त्यांचा उल्लेख, सरकारच्या मुख्य अंगाचे वर्णन असते. सार्वभौम सत्तेचे विभाजन असते. आणि त्या सर्व शक्ती अंमलात आणण्यासाठी सिध्दांत निर्देशित केले जातात.''

८. **चार्ल्स बर्गेड –** ''संविधान हा आधारभूत कायदा आहे. राज्याचे सरकार संघटीत केले जातात. त्यानुसार व्यक्तीचे तसेच नैतिक नियमांचे पालन करणाऱ्या मनूष्य आणि समाजाचे परस्पर संबंध सुनिश्चित केले जातात.

**व्याख्यांचा मतितार्थ –**

१. सर्वोच्च शासनाच्या संघटीतपणासाठी संविधान अनिवार्य आहे.
२. त्याद्वारे सरकार आणि जनतेचे संबंध निश्चित होतात.
३. राज्याची सत्ता अंमलबजावणी संविधानाने सुस्पष्ट होते.
४. राज्यकर्त्यांच्या आततायी धोरणांपासून नागरीकांच्या अधिकारांचे संरक्षण करता येते.
५. संवैधानीक अंमलबजावणीतून राज्याचे महत्वपूर्ण स्थान प्रचितीस येते.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 225 : Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy
ISSN : 2348-7143
Feb. 2020

६. स्विकृत सिध्दांत, अंगिकृत ध्येय आणि व्यवहार यांची तफावत लक्षात येते.

७. कायद्यासमोर समानता व कायद्याचे राज्य स्थापन करण्यासाठी संविधानाशिवाय तरणोपाय नाही.

**राजकीय नितीमत्ता आणि दलबदलूंचे राजकारण –**

सांसदीय शासनप्रणालीमुळे विधीमंडळात (संसद) आणि कार्यकारी मंडळात त्यासाठी सत्पात्र भरणा अगत्याचा ठरतो. लोकांची जागृती सुध्दा अनिवार्य असते. प्रदीर्घकालीन शिक्षण–प्रशिक्षणाची जय्यत मोहीम त्याकरीता निरंतर राबवावी लागेल. तूर्तास संविधानाचे संरक्षण आणि लोकांच्या मुलभूत अधिकारांचे निर्वहन न्यायालयीन सक्रियतेने संभव आहे. न्यायालयीन पुनर्निर्णयाचा अधिकार समर्थकपणे वापरून सर्वोच्च न्यायालय सरकारचे धोरण, विधीमंडळाचे कायदे आणि राजकारणाचे अंतस्थ हेतू जर लोकहितैषी, राष्ट्रहितैषी नसतील तर परतावून लावू शकते. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीपासूनच स्वार्थांध, सत्तापिसाट राजकारणी सोयी–सुविधांसाठी दल बदलाच्या मोहीमेचे प्रवर्तक ठरतात. त्यावेळेस पेप्सू विधानसभेचे जनसंघाद्वारे निवडणूक आलेले आमदार कॉंग्रेसमध्ये सामिल झाले. १९६७ नंतर त्याला जास्तच ऊत आला. १९६७ पांसून १९७० पर्यंत २७०० लोकांनी पक्षांतरे केलीत. त्यापैकी २१२ आमदार मंत्री बनले. यावरून पक्षात असणारांना पक्षाची विचारसरणी, ध्येयधोरण किती मान्य असते? केवळ सोयी सुविधांसाठी व्यवसाय–व्यापार म्हणून राजकारणात प्रविष्ट होणारांचा राष्ट्रीय दृष्टीकोन किती तकलादू हे सहज लक्षात येते. अंतर्विरोधाच्या आगळीकीवरून उफाळलेला दलबदलूपणा थांबविण्यासाठी तत्कालीन भारतीय जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रो. बलराज मधोक यांनी विविध राजकीय पक्षांशी पत्रव्यवहार केला. यु.एन.आय.च्या सर्वेक्षणानुसार १९६७ च्या ३४४७ आमदारांपैकी ३१४ आमदारांनी पक्षांतरे केलीत. हरीयाणाची स्थिती विशद करतांना श्री. रणधीर सिंह म्हणतात–" मुख्यमंत्री राव विरेंद्र सिंह आमदारांची खरेदी करत आहेत आणि प्रत्येक आमदाराला नादी तलेच हुंडयामध्ये मंत्रीपदाची लालच देत आहेत. ही अत्यंत शरमेची बाब आहे. अशांमुळे घटकराज्यांमध्ये जितके सक्रिय तेवढेच दुष्ट प्रवृत्तींना आळा आणण्यासाठी सर्जनशील राष्ट्रीय मन सक्रिय असणे आवश्यक आहे. न्यायालय शासकीय यंत्रणेचा एक घटक आहे.

कमालीची अस्थिरता आली. १९७८ ते १९८२ दरम्यान चार वर्षात आंध्रप्रदेशात डॉ. चेन्ना रेड्डी, टी. अंजैय्या, बी.बी. रेड्डी, विजयभास्कर रेड्डी असे चार मुख्यमंत्री झाले. १९८०–८७ या ८ वर्षात महाराष्ट्रात अंतुल, भोसले, वसंतदादा पाटील, शिवाजीराव निलंगेकर आणि शंकरराव चव्हाण हे पाच मुख्यमंत्री झाले. केवळ आगामी निवडणूकांच्या भयाने शासन स्थिरत्व शक्य नाही. १९८९, १९९१, १९९८, १९९९ याप्रमाणे एका दशकात ५ सांसदीय निवडणुका झाल्या. १९९६ ते १९९८ दरम्यान एच. डी. देवेगौडा आणि इंद्रकुमार गुजराल पंतप्रधान असतांना तेलगु देसमचे चंद्राबाबू नायडू संयुक्त मोर्चाचे संयोजक होते. १९९८ नंतर २००८ पर्यंत भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेत आली. चंद्राबाबूंनी आंध्रप्रदेशला निरंतर मदत मिळावी म्हणून सोयीची भूमिका घेतली आणि १९९६ पासून २००५ पर्यंत आंध्रप्रदेशाला सहाय्यकता आली. नेत्यांच्या भूमिकेवरून जनतेच्या भूमिका तयार होतात. सनदशीरता न्यायालयीन सक्रीयतेनेच तपासता येईल. अशा तऱ्हेने मात्र आर्थिक लाभापोटी सामाजिक नितीमत्ता, संवैधानिक विधीसंहिता व राष्ट्रीय प्रगती धोक्यात येवू शकते. त्याबाबत 'पार्लीयामेन्टरयन' या पत्रकात १९९५ साली 'सांसदीय सहभागी' या लेखात लोकसभेचे माजी महासचिव सी. जी. सी. भारद्वाज म्हणतात – "एप्रिल १९९३ पासून भारताची संसद आणि काही घटकराज्यांची कायदेमंडळे बजेटवर चर्चा करतांना संसदेचे संभाव्य प्रारूप शासनाद्वारा नियमित न होता शासनाच्या सहयोगी संस्थांच्या (पक्षांच्या) स्वरूपात प्रत्ययास येते." हा सुचित इशारा गृहित धरल्यास संवैधानीक मुलभूत तत्वांची जोपासना करण्यासाठी न्यायालयीन सक्रियतेशिवाय तरणोपाय नाही.

**सत्ता बळकटीसाठी अधिकारांचे हनन –**

प्रारंभी भारतात संसदेत आणि बहुतांश घटकराज्यांमध्ये कॉंग्रेसचीच सरकारे होती. स्पष्ट बहुमत होते. अर्थात सत्ता सोयीस्कर घटनादुरूस्त्या करतांना गैरवापर झाला. इंदिरा गांधींच्या वैयक्तिक स्वार्थापोटी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व लोकसभेचे सभापती यांच्या निवडणूकीसंबंधीच्या बाबी नव्याने निर्माण करण्यात आल्या. नवी प्राधिकरणे बनवली. त्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येवू नये. या विधेयकावर ७ ऑगस्ट १९७५ रोजी लोकसभेत चर्चा झाली. त्याच दिवस लोकसभेने ते विधेयक पारीत केले. दुसऱ्याच दिवशी राज्यसभेने ते पारीत केले. आणि पुरेशा राज्यांची संमती दर्शवून पंतप्रधानाचे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्धचे अपिल सर्वोच्च न्यायालयात सूनावणीला येण्याच्या आदल्या दिवशीच म्हणजे १० ऑगस्ट १९७५ रोजी राष्ट्रपतींची त्याला संमती दिली.

एप्रिल १९७३ पासूनच्या दशकात मुलभूत हक्कांच्या अधिक्षेपाच्या संदर्भात न्यायालयाकडून पूर्नविचार केला जावू नये म्हणून एकूण ५८ कायद्यांचा समावेश नव्या सूचीत करण्यात आला. परंतु मुलभूत हक्कच रद्द करण्यात आले होते व बहुतेक सर्व विरोधी पक्ष नेत्यांना न्यायालयीन चौकशीविना तुरूंगात डांबून ठेवल्यामुळे संसदेत प्रभावी विरोधी पक्ष नव्हताच. त्यामूळे नवव्या सूचीचा वापर घटना डावलण्याचे साधन म्हणून करण्यात आला.

१९७६ च्या सुरूवातीला सरकारने घटनेचे ३५९ कलम दुरूस्त करण्याची कारवाई सुरू केली. या दुरूस्तीद्वारे आणिबाणीच्या काळात घटनेच्या १९ व्या कलमातील नागरीकांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली झाल्यास न्यायालयाकडे त्याविरूद्ध दाद मागता येणार नव्हती. ४२ व्या घटनादुरूस्तीने मुलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्वे महत्त्वपूर्ण ठरविली. काही नवीन मार्गदर्शक तत्वे अंतर्भूत केली. कायदेमंडळाचे कायदे २/३ बहुमताने (न्यायाधीशांच्या) अवैध ठरवावे अशी तरतुद केल्याने कायदेशीर पूर्नविचार हा अधिकार संसदेचे


Website : www.researchjourney.net Email : researchjourney2014@gmail.com
Peer Reviewed Journal

ISSN : 2348-7143 Feb. 2020

सार्वभौमत्व सिध्द करण्यासाठी अडचणीत आणला. या दुरूस्तीने समाजवाद व मबनसंतपेउ हे शब्द प्रस्तावनेत घालण्यात आहे. देशांचे ऐक्य व एकसंघता (न्दपजल – प्दजमहतपजल) टाकण्यात आला आहे. उच्च न्यायालयाचा आवाका संकुचित करून स्पष्टपणे नमूद केला. लोकसभेचा कार्यकाळ ६ वर्षे केला. कलम १०० व १८९ ची कोरमची तरतूद (किमान उपस्थिती) वगळण्यात आली.

**असे न्यायाधीश – असे राजकारण –**

१९९१–९३ दरम्यान आर. रामास्वामी हे पंजाब आणि हरयाणा हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश असतांना त्यांनी आर्थिक गैरव्यवहार केला. प्रवासदेयके व महागाई भत्त्याच्या बिलाबाबत अफरातफर आणि घरावर अमाप उधळपट्टी केली. चौकशीसाठी तत्कालीन लोकसभा सभापतीनी तेव्हाचे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश पी. बी. सांवत यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पी. डी. देसाई आणि सुप्रिम कोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधिश तथा नामांकीत विधीज्ञ ओ. चिनप्पा यांची एक चौकशी समिति बनविली होती. चौकशीत आरोप खरे ठरलेत. नववी लोकसभा विसर्जित झाली. दहाव्या लोकसभेने महाभियोगाचा प्रस्ताव मांडला. काँग्रेस पक्षाने मतदानात भाग घेतला नाही. प्रस्ताव बारगळला. त्या न्यायाधिशांची राजीव गांधींनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिश पदावर नेमणूक केली. सेवानिवृत्तीनंतर त्या न्यायाधिशांना जयललीतांनी राज्याच्या विधी आयोगाचे अध्यक्ष बनविले.

**सी. ए. ए., एन.आर.सी., एन.पी.आर. आणि न्यायालयीन सक्रियता –**

१० डिसेंबर २०१९ लोकसभेत सिटीजनशीप अमेंडमेंट अॅक्ट मंजूर झाल्यावर राज्यसभेने देखील मंजूरी दिली आणि राष्ट्रपतीने शिक्कामोर्तब केले. बांग्लादेश, अफगाणिस्तान आणि पाकीस्तानातून छळामुळे भारतात पळून आलेल्या हिंदू, ख्रिश्चन, शिख, बौध्द, जैन आणि पारसी यांना त्यामुळे भारतात नागरिकत्व मिळेल. त्यासाठी छळाला कंटाळून आल्याचे त्यांना सिध्द करावे लागेल. त्यांना ६ वर्षात नागरीकत्व दिले जाईल. सध्या ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेल्या लोकांना भारताचे नागरीकत्व दिले जाईल. पूर्वी मुदत १२ वर्षाची होती. आसाममध्ये ही प्रक्रिया राबवितांना २२ प्रकारचे पूरावे मागितलेले आहेत. नागरीकत्व सिध्द करण्यात अपयशी ठरल्यास विदेशी नागरीक लवादाकडे अपील करता येते. लवादाच्या निर्णयालाही आव्हान देण्याचा अधिकार आहे. नागरीकत्व सिध्द न करू शकणाऱ्या लोकांना ताबा केंद्रात (डिटेक्शन सेंटर) ठेवण्यात येईल. केंद्र सरकार घुसखोरांच्या देशांशी संपर्क करेल. पकडण्यात आलेल्यांचा तपशील संबंधित देशाने स्विकारला तर त्यांना मायदेशी पाठविले जाईल. या कायद्याच्या विरोधात विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. हा कायदा संविधानविरोधी, धार्मिक आधारावर भेदभाव करणारा असल्याचे सांगण्यात येते. पहील्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने कायद्याला स्थगिती देण्यास नकार दिला. २२ जानेवारी २०२० रोजी या याचिकेवर सुनावणी आहे. केंद्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. ब्रम्हदेशात रोहिंग्याचा छळ होतो. श्रीलंकेत तामिळांचा छळ होतो. त्याबाबत तरतूद नाही. कायदा मुस्लीम, मागास, बहुसंख्याकांना धोक्यात टाकणारा असल्याचा संशय वर्तविण्यात येत आहे. एन. आर. सी. म्हणजे छंजपवदंस त्महपेजमत व ब्पजपप्रमदे नागरीकत्व राष्ट्रीय रजिस्टर त्यानूसार देशात राहणाऱ्यांच्या नागरीकत्वाची पडताळणी. त्यासाठी कोणती पध्दत अवलंबिली जाईल. नागरीकत्व सिध्द करण्यासाठी कोणती कागदपत्रे द्यावी लागणार? जागृतीअभावी जनप्रक्षोभ व्यवस्था विध्वंसाला द्योतक ठरू नये. प्रत्येक सत्तापक्ष लोकशाहीत जनाधार टिकविण्यासाठी, मतदारांचा व्यापक संग्रह जूळविण्यासाठी आपले जाहीरनामे अंमलात आणतो. केंद्र आणि घटकराज्यांमध्ये वेगवेगळया पक्षांची सरकारे अस्तित्वात असल्यास केंद्र–राज्य यांच्यात तणाव निर्माण होतो. एन. पी. आर., सी. ए. ए., एन. आर. सी. या विधेयकावरून सध्या केरळ, बंगाल, महाराष्ट्र इ. राज्यांनी केंद्र शासन विरोधी भूमिका घेतली.

नवा नागरीकत्व कायदा रद्द करण्यात यावा, असा मागणी करणारा ठराव केरळ विधानसभेने मंगळवार – ३१ डिसेंबर २०१९ रोजी पारीत केला. राज्यांच्या विधानसभानांही स्वतःचा विशेषाधिकार असतो आणि तिथे पारीत ठरावानांही महत्व असते, असे केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन यांचे मत आहे. त्यावर केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी सडकून टिका केली. राष्ट्रीय पातळीवर कायदा करण्याचा अधिकार फक्त संसदेलाच आहे. राज्यांना नाही. संसदेने पारीत केलेला कायदा व केंद्रीय सूचित टाकण्यात आलेला कायदा देशातील कोणतेही राज्य नाकारू शकत नाही. तसे त्या कायद्याची अंमलबजावणी रोखण्याचा ठरावही विधानसभा पारीत करू शकत नाही. नागरीकत्व कायदा हा एका राज्यापूरता मर्यादीत नसून, तो राष्ट्रीय स्तरावरील आहे आणि त्याची अंमलबजावणी करणे सर्व राज्यांना बंधनकारक आहे, असेही प्रसाद म्हणाले, केंद्र–राज्य तणाव निस्तारण्यासाठी कायदेतज्ञांचा सल्ला अपरिहार्य आहे. राजकारण कोणत्याही स्तराला जाते. महाराष्ट्रात शिवसेना–कॉंग्रेस–राष्ट्रवादीची महाविकास आघाडी तयार झाली. वाजपेयींच्या सरकारमध्ये २६ घटकपक्ष अंतर्भूत होते. नांदेडचे भाजपचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर आणि औरंगाबाद जिल्हयातील गंगापूरचे भाजप आमदार प्रशांत बंब यांनी एकमेकांवर ब्लॅकमेलींग आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप–प्रत्यारोप केले. असेच आरोप कौटूंबिक कलहात पती–पत्नी एकमेकांवर करतात.खंडणीसाठी, पोटगीसाठी कारस्थाने रचतात. नागरी विवादामुळे राज्यातील चार लाखाहून अधिक नोंदणीकृत सहकारी सोसायटया अडचणीत येत आहेत. नवे सायबर गुन्हेगारी विश्व विस्तारत आहे. स्वयंकेंद्रीत वृत्तीतून विभक्त कुटूंबवारी आली. आई–वडीलांची आबाड, मुलांच्या संगोपनाचा प्रश्न, घरकाम करणारे, मुलांना शाळेत पोहोचविणारे यांची व्यावहारीकता, बँकेतील ठेवींची सुरक्षितता अशा सर्वच क्षेत्रात आता न्यायालयीन सक्रियता तीव्र होण्याची गरज आहे. कायद्याचे जाणकार असल्याने विधिज्ञांनी त्याबाबत पुढकार

घ्यावा. एकट्या महाराष्ट्रात १४ डिसेंबर २०१९ रोजी लोक न्यायालयात ९ लाख ७५ हजार ३७७ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली होती.
त्यापैकी १ लाख ४७ हजार ७१० प्रकरणे निकाली निघालीत. बरेचदा क्षुल्लक कारणाने वैधानिक वैमनस्य पेटते. न्यायालयीन
सक्रियता त्यावर त्वरीत प्रतिबंध आणू शकतो आणि तोच प्रतिबंधाचा मुलगामी मार्ग ठरतो. वैधानीक भाषा, तथ्यांचे सैध्दांतिक
अन्वयार्थ, मुद्यांचे स्पष्टीकरण, गून्हयाचे प्रारूप, कायद्याचे प्रकार हे सर्व अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मगदुरावर अवलंबून
असते. राज्याचा दर्जा न्यायदानावरून ठरत असतो. वकील पक्षाकारांची बाजू मांडतात. पूरावे महत्वाचे ठरतात. खैरलांजी कांडात दलीत
कुटूंबाचा हकनाक बळी गेला. निर्भया कांडात देश ढवळून निघाला. हैद्राबादेत व्हेटनरी नर्स बलात्कारींचे विनदिक्कत एनकाउन्टर केले.
न्यायाचा तराजू समान गून्हयासाठी समानूपाती उभा राहीला. तर प्रश्नच न लगे. अजित पवार आणि सिंचन घोटाळा, मालेगाव बॉम्बस्फोट
आरोपी खासदार प्रज्ञा ठाकूरांचे करकरेंविषयी वक्तव्य इ. उबग आणतात. महाराष्ट्रात छत्रपती महाराजांच्या नावाचा सर्वत्र जयजयकार
होतो. रायगड महाराजांची राजधानी. रायगडाच्या रस्ते, सुशोभीकरणासाठी १८७ कोटीचे कंत्राट दिले. मुख्य कंत्राटदाराने दुसऱ्याला
कंत्राट दिले. त्यासाठी शासनाने त्याला आगावू ५: दिले. म्हणजे २३ कोटी रू. दिले, असे रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार
संभाजीराजे छत्रपती यांनी वक्तव्य केले. यावरून नेत्यांचा नीतीमत्तेचा स्तर कळतो. जनतेची प्रगती काय करतील? न्याय देतील?
अॅट्रासिटीच्या कायद्याचा सुध्दा गैरवापर दलीत आणि दलीत नेत्यांपेक्षा दलीत्तेतर नेत्यांनी प्रतिपक्षाला अडचणीत आणण्यासाठी केलेला
आहे. अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटमध्ये निधी उपलब्ध केला जातो.

२०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या १६.६: म्हणजे निधी २,००,२५१ कोटी मिळायला पाहीजे. अनुसूचित
जमातींची संख्या ८.६% असल्याने निधी रू. ८१,९९३ मिळायला पाहीजे होता. मात्र त्यांचे एकूण २.८२ लाख कोटी रूपये राज्य
सरकारने नाकारले. शिक्षण संस्थासुध्दा भ्रष्टाचाराने ग्रासलेल्या आहेत. तामिळनाडूतील एका शिक्षणसंस्थेतून तब्बल ३० कोटी जप्त केले.
त्या संस्थेने विद्यार्थ्यांकडून वसूल केलेल्या १५० कोटीचा हिशोब ठेवला नाही. असेच महाराष्ट्रात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशीपचे
पैसे संस्थांनी हडप केलेत. के. जी. १ च्या अॅडमिशन पासून तर मेडीकल इंजिनियरपर्यंत लक्षावधी–कोटयावधी खर्चून सेवाभावी,
समर्पित, सत्शील नागरीक कसे घडतील? पैसा देवून नोकरीवर लागणारांची गुणवत्ता–नीतीमत्ता कशी तपासणार? वरीष्ठ अधिकारी भ्रष्ट
असेल तर त्याची संपूर्ण कार्यालयीन फौज राजरोस भ्रष्टाचार करते. महिला अधिकाऱ्याला गून्हयात अडकविण्याच्या धाकावर एसीबीच्या
एका पोलीस अधिकाऱ्याने अडीच लाख रूपये लाच मागितली. भ्रृणहत्या, गर्भपात घडविण्यासाठी डॉक्टरी यंत्रणा दिमतीस असते. नोकरी
बळकाविण्यासाठी मागास जातींचे खोटे प्रमाणपत्र बनवितात. एसीबीने २०१९ या वर्षात लाचखोरीची १११ प्रकरणे नोंदविली. त्यातील
सर्वाधिक २२ प्रकरणे पोलीस विभागाशी संबंधित होती. राष्ट्रीय संस्थेची फसवणूक करून बनावट पदवी प्राप्त करणारे सुमारे ३५० ठगबाज
बिनदिक्कत लठ्ठ पगाराच्या नोकऱ्यावर आस्थापित आहेत. (लोकमत ४ जानेवारी २०२०) ही बातमी वाचून दुसऱ्यांच्या गुणवत्तापूर्ण
अधिकारांचा अधिक्षेप करून निर्लज्जपणे मौज करणारांची भयंकर बेईमान औलाद पाहून आश्चर्याचा धक्काच बसला. लहान मुलांसाठी
आंगणवाडी–बालवाडी करीता मिळणारा आहार हडप करणे. विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिप हजम करणे इ. प्रकार नीतीमत्तेला गर्भातच
गोठविणारे आहेत. त्यासाठी न्यायालयीन सक्रियतेची मोहीम तीव्र करण्याची नितांत आवश्यकता आहे.

निष्कर्ष –

१. पक्षीय विचारधारेपेक्षा नेते वैयक्तिक स्वार्थाला खतपाणी देत असतील तर राजकीय व्यवस्था डळमळीत होणे स्वाभाविक आहे.
२. नीतीमत्तेच्या जपणूकीसाठी समर्पित सद्सद्विवेकबुध्दीचे धोरण नसल्यास नेते सातत्याने कायद्याचे उल्लंघन करतात व अन्याय विस्तारत जातो.
३. अंतर्मनाच्या सौजन्याशिवाय ससदय समन्यायबुध्दीला वाव नसल्याने दुर्जनपणा समाजात विकार पेरण्यात यशस्वी ठरतो.
४. राजकीय लोकशाहीवर पक्षीय संघटनांची मातब्बरी प्रस्थापित झाल्याने संविधानानुगत राष्ट्रीय ध्येयधोरण की पक्षीय नेतृत्वाची भावनाखोर चालबाजी? हा प्रश्न उद्भवतो.

उपाययोजना –

१. सत्तालंपट कुनीतीखोर राजकारण्यांमुळे राष्ट्रीय ध्येयनीती धोक्यात येत असल्याने त्याच्या दळभद्री व्यवहारांवर त्वरीत
प्रतिबध आणण्यासाठी कठोर कायद्याची गरज आहे. शासकीय परीघात धोरण ठरवितांना, निर्णय घेतांना संविधानानूगत
व्यावहारीक दृष्टीकोनाची स्पष्टता असावी.
शिक्षण–प्रशिक्षणाने प्रबोधन करण्याची गरज आहे.
२. संविधानाची संहिता लोकांप्रत रूजविण्यासाठी
पाहीजे. केवळ न्यायाधीश, वकील यांच्यावर 'न्यायालयीन सक्रियता'
३. 'न्याय' ही संकल्पना व तिचे महत्व समजून दिले
विसंबून राहू नये.
प्रतिबंधित केले पाहीजे. त्यांच्या सोयी–सुविधा तात्काळ
४. अन्यायखोर नागरीक, अधिकार, संस्था, संघटनांना ताबडतोब
समाप्त केल्या पाहीजे.

**ISSN :** 2348-7143
**Feb. 2020**

चंद सितारे आते हैं आसमाँ से,
जमीन पर अंधेरा चमकाने।
मिट्टी की धुल भी नही छटती जनाब,
फिसादी जाहिल जल्लाद बनाते हैं गमखाने।।

**संदर्भ**


१. डॉ. भोळे, भा. ल. – ''भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण'' पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, २०६, राम मंदीर गल्ली, टिळक पुतळा, महाल नागपूर - ४४००३२ (द्वि.आ. २०१०).
२. गोस्वामी, आचार्य बालचंद्र- ''संसदीय लोकतंत्र'' राज पब्लिशिंग हाऊस, ४४ परनामी मंदीर, गोविन्द मार्ग, जयपूर - ३०२००४ (२००७).
३. नकला, बी. सी. – ''संविधान और सरकार'' अर्जुन पब्लिशिंग हाऊस ४८३१/२४ प्रल्हाद गल्ली, अंसारी रोड, दरियागंज, नई दिल्ली - ११०००२ (२००९).
४. पळशीकर, सुहास., व्होरा, राजेंद्र – ''भारतीय लोकशाही'' डायमंड पब्लिकेशन्स् १२५५, सदाशिव पेठ, लेले संकुल पहिला मजला, निंबाळकर तालमीसमोर पुणे ४११०३० (२०१०).
५. तिवारी, डॉ. रजनी – ''भारत में दलीय व्यवस्था और संसदीय लोकतंत्र'' अर्जुन पब्लिशिंग हाऊस ४८३१/२४ प्रल्हाद गल्ली, अंसारी रोड, दरियागंज, नई दिल्ली - ११०००२ (२००९).
६. गोडबोले, माधव – ''भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा'' राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० (२०१२).
७. श्रीवास्तव, सुधारानी – ''भारत में मानवाधिकार की अवधारणा'' अर्जुन पब्लिशिंग हाऊस ४८३१/२४ प्रल्हाद गल्ली, अंसारी रोड, दरियागंज, नई दिल्ली - ११०००२ (२००६).